**दिनांक १८.२.२०१६ रोजी गट विकास अधिकारी यांच्या घेण्यात आलेल्या आढावा सभेचे कार्यवृत्त.**

**प्रकल्प संचालक :-** यांनी इंदीरा आवास योजने अंतर्गत घरकुल बांधकामबाबत १४ तालुक्यांचा आढावा घेतला. १२ पंचायत समितींनी अजुनपर्यंत प्रतिक्षा यादी पाठविलेली नाही. हि खेदाची बाब आहे फक्त अमरावती व मोर्शी यांचीच प्रतिक्षा यादी मंजुर झालेली आहे. २४ तारखेपर्यंत प्रतिक्षा यादी मंजुर झाली नाही तर प्रशासकिय कारवाई होईल याची दखल घ्यावी . प्रतिक्षा याद्या उद्या दुपारपर्यंत आणावी. सध्या गुणाप्रमाणे असेंडींग ऑर्डरनुसार पाठवा.जे गाव एससी/ एसटी चे लाभार्थी राहीले तिथेच पर्यवेक्षक तुमचे प्रतिनिधी पाठवा. अपुर्ण घरकुलाचे पैसे उद्यापर्यंत आर.टी.जी.एस. नी मिळतील ते पाहावे . दि. २२.०२.१६/२३.०२.१६ ला परत या विषयाचा आढावा होवु शकतो. उद्या ३.०० वा पालकमंत्र्याची मिटींग आहे. सर्वांनी माहिती सह हजर रहावे. कामे युध्दा स्तरावर करुन विभागात प्रथम क्रमांक देण्याबाबत प्रयत्न करा.

**उप मु. का. अ. (म.बा.क)**:- यांनी सन २०१४-२०१५ चे अंगणवाडी बांधकामाबाबत आढावा घेतला. पैसा अखर्चित असुन १.८४ लक्ष रुपये खर्च करण्याचे परवानगीचे पत्र दिले आहे. सन २०१४-१५ चे कामाबाबत ११६ पैकी ७-८ कामे सोडुन बाकी कामे सुरु झाली असुन पुर्ण पैसे खर्च होतील याकडे लक्ष द्या.

**उप मु. का.अ. (स्वच्छ भारत मिशन) :-** भौतिक तथा आर्थिक उदिष्ट ३१ मार्च २०१६ पर्यंत आहे १ एप्रिल नंतर आम्ही १ रुपया सुध्दा देवु शकणार नाही. यामध्ये लक्ष घालण्याची गरज असुन प्रायॉरीटीचा विषय आहे. वारंवार पाठपुरावा करुनसुध्दा टार्गेट पुर्ण नाही. सर्वांना तळागाळातील यंत्रणा कामाला लावा. काम करत नसतील तर त्यांचे प्रस्ताव पाठवा. ए.आय.पी च्या ग्रामपंचायतींनी निट लक्ष घालुन काम करा. अजुन एक ते दीड महिना आहे. आर्थिक अडचण ही आहे, की १ एप्रिल नंतर पैसे देवु शकणार नाही. लाभार्त्यांचे अकाउंटला पैसे जायला पाहीजेत.

**उप मु.का.अ. (सा):-** प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा स्वच्छता कमिटी असुन त्यांनी बांधकामाचे नियोजन करणे गरजेचे आहे. पंचायत व पाणिपुरवठा यांनी जास्त लक्ष घालावे. कोणत्याही संस्थेला आगावु रक्कम देवु नका, कुणाशी करारनामा करु नका.

**उप मु.का.अ. (स्वच्छ भारत मिशन ):-** लाभार्थ्याला पैसे जातील अशाप्रकारे काम केले पाहिजे. पं.स चांदुर रेल्वे निर्मल पंचायत करण्याच्या दृष्टीने लक्ष घालुन काम करा. विदर्भातील तथा जिल्हातील पहिला हगणदारीमुक्त तालुका बहुमान मिळू शकतो. वापरण्यायोग्य सौच्छालय हा आपला कन्सेप्ट आहे. त्यानुसार जास्तीत जास्त उद्दीष्ट पुर्ण करायचे आहे. पाणी गुणवत्ताबाबतचा रीपार्ट परवा पाठवला आहे. चांगल्या प्रतीचे ब्लिचिंग उपलब्ध करुन त्याचा दररोज वापर करावा. ए.आय.पी. मध्ये जरी ग्रामपंचायती नसतील तरी त्याचे आपण काम करु शकतो. २० % रक्कम वळती करता येते.

**उप मु.का.अ. (म.बा.क):-** चांदुर बा., भातकुली, अमरावती, दर्यापुर, अचलपुर, चिखलदरा, धारणी इत्यादी सलेअंना वित्तविप्रेशन जुळत नसल्यामुळे ताळमेळसाठी पाठवा.

**लेखाधिकारी** :- यांनी स्थानिक निधी लेखा/पंचायतराज/महालेखापाल यांच्या प्रलंबित मुद्दयांचे अनुपालन सादर करण्याचे अनुषंगाने तालुकानिहाय आढावा घेतला. अनुपालन लवकरात लवकर सादर करावे.

**उप मु.का.अ. (सा) :-** ८७७३ अनुपालनीय मुद्दे पेंडींग असुन RFD मध्ये ९० टक्के चे वर काम झाल्यास १ मार्क मिळेल. ताळमेळ तिन महिण्यातुन एकदा झालाच पाहीजे अन्यथा प्रलंबीत राहतील . आपली स्पर्धा पाच जिल्हाशी आहे. मार्क्स कमी पडता कामा नये कामाला लागा.

**लेखाधिकारी:-** अचलपुर/ चिखलदरा वगळता कुणीही वार्षिक लेखे दिलेले नाही. लवकरात लवकर सादर करा. १९९० पुर्वीचे अनुपालन मुद्दे नसतील तर नाही म्हणा. अखर्चित रक्कमा परत करुन माहिती द्या. उपयोगिता

प्रमाणपत्र सादर करा. अखर्चित रक्कमा व १३ वा वित्त आयोग इत्यादी बाबतची माहिती द्या. त्याशिवाय नवीन नियोजन करता येणार नाही. डी.सी.पी.एस. आणि जी.पी.एफ. ची बीले पगारबिलासोबत पाठविणे. १५ सप्टेबर च्या शासन निर्णयनुसार सादर करायचे आहे. यासाठी आपण कॅम्प घेणार आहोत.दि.२५.०२.१६ ला उपसचिव वित्त येणार आहेत. काही तांत्रीक अडचणी असतील तर संबंधित व्यक्तीला पाठवा.

**उप मु.का.अ. (सा):-** यंग जनरेशनला गोपनीय अहवालाची भविष्यात गरज आहे. त्यामुळे कामाचा रिझल्ट म्हणजे तुमचा गोपनीय अहवाल.३१ मार्च पर्यंत विभागातील कामे पुर्ण करावे. २३.०२.२०१६ ला दुपारी १:०० वा. पाणीटंचाई सभा आहे. त्यासाठी सर्वजण आराखडयासह हजर रहा.

**उप मु.का.अ. (पं):-** महत्वाचा विषय पी.आर.सी. अफरातफर प्रकरणे व त्यासंबंधी वसुली बाबतचा आहे. तालुकानिहाय प्रलंबित मुद्यांची आकडेवारी वाचुन दाखविली. पी.आर.सी. संबंधी साक्षीमध्ये तुम्हालाच उत्तरे द्यायची आहेत. हा विषय प्रधान सचिवांच्या प्राधन्याचा आहे. त्यामुळे प्राथमिक जबाबदारी आपली आहे. आपले सरकार या पोर्टलवर दि. २७.०२.२०१६ ला अहवाल सादर करायचा आहे. त्यासाठी सर्व पंचायत समितीला पासवर्ड देण्यात आला. त्यानुसार तक्रारी निकाली काढायच्या आहेत. पुढील लोकशाही दिनाचे वेळी आयुक्त स्वतः आढावा घेणार असल्यामुळे अहवाल तयार करा. महाऑनलाईनची कामे ३१ मार्चपर्यंत पुर्ण करा. २५-१५ अंतर्गत लोकप्रतिनिधंनी सुचविलेली कामे पुर्ण करा किंवा पैसे परत करा. १३ वा वित्त आयोगाचे उपयोगिता प्रमाणपत्रसादर करा.
पी.आर.सी. मध्ये तक्रारीनुसार आठ दिवसात चौकशी करुन अहवाल सादर करा. १४ वित्त आराखडे अप्राप्त असुन लवकर पाठवा. सन २०१३-१४ चे ग्रामपंचायतचे १०० टक्के ऑडीट करायचे आहे. जे सरपंच/ग्रामसेवक करणार नाहीत त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. खातेचौकशी प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढा. करवसुलीबाबतचा विषय महत्तवाचा असल्ज्यामुळे त्याचे अहवाल लवकर द्या.

**उप मु.का.अ. (सा):-** ग्रामफंडातुनअपंगावर म.बा.क, समाज कल्याण पैकी ३ टक्के, १० टक्के, १५ टक्के हा महत्त्वाचा खर्च आहे. जे करणार नाहीत त्या पदाधिकारी,कर्मचाऱ्यास (महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ कलम ३९) नुसार कार्यवाही करण्यात येईल.

**स.क.अ./वि.अ (पं) :-** यांनी खर्चाचा मासिक अहवाल टक्के बाबतचा आढावा सर्व पंचायत समितीकडुन घेतला.

**उप मु.का.अ (नरेगा ) :-** नरेगा मधील मजुरांच्या प्रदानामध्ये होत असलेल्या विलंबाबाबत आढावा घेण्यात आला. मजुरीचे प्रदान १५ दिवसात करण्याबाबत सर्व गटविकास अधिकारी युना सूचना देण्यात आली. धडक सिंचन विहिर तसेच नरेगाच्या विहिरी मार्च पर्यंत पूर्ण करण्याबाबत नियोजन करुन कार्यवाही करावी अशी सूचना गटविकास अधिकारी यांना दिली. जानेवारी अखेर पर्यंत सर्व प्रलंबित मस्टरचा आढावा घेण्यात आला व त्वरीत ते ऑनलाईन वर भरण्याची कार्यवाही करावी .

शेवटी मजुर उपस्थिती आढावा घेण्यात आला व सभा समाप्त करण्यात आली.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती.**